Loknete Hon. Hanmantrao Patil Charitable Trust's

# ADARSH COLLEGE, VITA

Shriramnagar, Mayani Road

Tal- Khanapur Dist- Sangli 415 311

Website-www.acvita.edu.ac.in

Reaccredited by NAAC with 'A' Grade (CGPA-3.14)

Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur

IN PURSUIT OF KNOWLEDGE

## SKILL DEVELOPMENT WORKSHOP



Adarsh College, Vita Est. 1999 Tal.Khanapur, Dist. Sangli


# कौशल्य विकास समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा अहवाल

कौशल्य विकास समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा आदर्श कॉलेज विटा येथे बुधवार दिनांक २०/०८/२०२५ रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये आजकाल पारंपारिक शिक्षणाबरोबर बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये केला पाहिजे यासाठी आपण पारंपारिक शिक्षणाबरोबर कौशल्य विकसित केले पाहिजेत असे मत प्रास्ताविकामध्ये प्रा. डॉ. निसर्गंध सर यांनी व्यक्त केले. यानंतर प्रा. लक्ष्मण पवार सर यांनी मुलांना व्यवसाय मार्गदर्शन करण्यासाठी शेअर मार्केट हा एक केंद्रीकृत प्लॅटफॉर्म आहे जिथे सर्व खरेदीदार आणि विक्रेते वेगवेगळ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये ट्रेड करण्यासाठी एकत्र येतात अशी माहिती सांगितली. प्रा. देसाई सरांनी मुलांना आयुष्यात जगत असताना शिक्षणातून मार्ग कसा काढावा असे प्रोस्थाहान् केले. प्रा.कोळी सर यांनी ए आय टूल आणि आरी वर्क या कोर्समधून रोजगाराची संधी कशी मिळवायची याबद्दल मार्गदर्शन केले.यानंतर प्रा. जाधव सर यांनी आचार्य चाणक्य कोर्स बद्दल माहिती दिली. प्राध्यापिका शिंदे नेहा यांनी ऑनलाइन SWAYAM आणि MooC या कोर्से ची अंमलबजावणी कशा पद्धतीने करावी याची माहिती दिली. प्रा. माने सर यांनी निरंतर शिक्षण अभ्यासक्रम हा शिक्षणापासून वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, आर्थिक उत्पन्नात कौशल्य प्राप्त करून देणे, त्यांचा जीवन स्तर उंचावणे, नेतृत्व विकास अशा कौशल्याची संधी निर्माण करून देणे या हेतूने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत निरंतर अभ्यासक्रमाची 11 कोर्सेस आपल्या महाविद्यालयामध्ये घेणार आहे याबद्दल माहिती दिली. प्रा.पंडित सर यांनी शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या मार्फत राबवले जाणारे skill कोर्स याची माहिती दिली. प्रा. धनवडे सर यांनी MIS DATA Analysis या कोर्स ची पात्रता काय आहे तसेच या कोर्सचा व्यावहारिक जीवनात उपयोग रोजगाराची संधी याचे मार्गदर्शन केले. यानंतर प्रमुख पाहुणे आपल्या कॉलेजचा माजी विद्यार्थी सागर कारंडे यांनी मुलांना त्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये आलेले अनुभव व्यक्त केले. यानंतर अध्यक्ष मनोगत आपल्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहिते सर यांनी कौशल्य कोर्सचे महत्व आणि त्याची थोडक्यात माहिती सांगितली.या कार्यशाळेमध्ये आदर्श कॉलेज, विटा चे 30 प्राध्यापक वृंद , 110 विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. कांबळे मॅडम आणि प्रा. काळे सर यांनी केले.शेवटी प्रा.डॉ.चिन्नी सर यांनी आभार व्यक्त करून कार्यशाळेची सांगता केली.

Adarsh College,Vita
Est. 1999
Tal.Khanapur,Dist.Sangli





एकदिवसीय कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ मोहिते सर




मार्गदर्शन करताना प्रा.कोळी सर

Adarsh College, Vita
Est. 1999
Tal.Khanapur,Dist.Sangli




कार्यशाळेमध्ये उपस्थित विद्यार्थी

समन्वयक

(प्रा. धनवडे व्ही. बी.)

PRINCIPAL
Adarsh College, Vita
Tal-Khanapur, Dist-Sangli

Adarsh College, Vita
Est. 1999
Tal.Khanapur, Dist.Sangli